# मिरा भाईंदर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग
## प्रेसनोट

- **दिनांक 11 ऑक्टोबर 2024 ते 25 ऑक्टोबर 2024 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात "दिपावलीपूर्व डीप क्लिन ड्राईव्हचे" अर्थात "स्वच्छतेची दिवाळी" या मोहिमेचे आयोजन**

स्वच्छ भारत अभियान व राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात "दिपावलीपूर्व डीप क्लिन ड्राईव्ह" अर्थात "स्वच्छतेची दिवाळी" ही मोहीम राबविण्यात येणार आहे. मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त अनिकेत मानोरकर व उपायुक्त डॉ. सचिन बांगर यांच्या समन्वयाने शहरात ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

स्वच्छ भारत अभियान व राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम अंतर्गत व महाराष्ट्र राज्याचे मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून मिरा भाईंदर शहरात Deep Clean Drive ही स्वच्छता मोहीम राबविण्यात येत आहे. शहरातील हवा स्वच्छ राहण्यासाठी धूलिकण कमी करणे आणि एकंदरीत संपूर्ण शहरातील मुख्य आणि अंतर्गत रस्ते सखोल पद्धतीने स्वच्छ करून धुवून घेणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. दिनांक 11 ऑक्टोबर 2024 रोजी प्रभाग समिती क्रमांक 04 व 06 कार्यक्षेत्रात, 18 ऑक्टोबर 2024 रोजी प्रभाग समिती क्रमांक 03 व 05 कार्यक्षेत्रात आणि दिनांक 25 ऑक्टोबर 2024 रोजी प्रभाग समिती क्रमांक 01 व 02 कार्यक्षेत्रात ही सखोल स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे. तरी शहरातील सुजाण नागरिक म्हणून आपण या "दिपावलीपूर्व डीप क्लीन ड्राईव्ह" अर्थात "स्वच्छतेची दिवाळी" या मोहिमेमध्ये सहभागी होऊन आपल्या घरातील तसेच सोसायटीमधील परिसराची स्वच्छता राखणे तसेच घराची साफसफाई करताना अडगळीत असलेल्या वापरात नसलेल्या परंतु वापरण्यायोग्य असलेल्या वस्तू आपल्या जवळच्या RRR सेंटरमध्ये देऊन यंदाचा दिपावली हा सण स्वच्छतापूर्ण व पर्यावरणपूरक साजरी करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन मा. आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांच्या वतीने करण्यात येत आहे.